# बृहन्मुंबई महानगरपालिका

## सार्वजनिक आरोग्य खाते

कुटुंब कल्याण व माता बाल संगोपन
सह कार्यकारी आरोग्य अधिकारी यांचे कार्यालय, रुम न. १३,
पहिला माळा, एफ/दक्षिण विभाग कार्यालय,
डॉ. बाबासाहेब आंबेडकर मार्ग, परळ, मुंबई १२

क्र. एचओ/९०८९/कुकवमाबासं/आस्था-१ दि. १०.०९.२०२५

## जाहिरात

मा. महानगरपालिका आयुक्त यांच्या मंजूरी क्र. एमजीसी/एफ/६९६२ दिनांक २६.०६.२०२५ अन्वये बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या सार्वजनिक आरोग्य खात्यांतर्गत कुटुंब कल्याण व माता बाल संगोपन विभागाकरीता खालील नमूद पदे निव्वळ तात्पुरत्या स्वरुपात कंत्राटी तत्वावर भरण्याकरीता जाहिरात प्रसारीत करण्यात येत आहे. प्रस्तुत जाहिरातीत नमुद केल्याप्रमाणे आवश्यक असलेली शैक्षणिक अर्हता/पात्रता धारण करीत असलेल्या इच्छुक उमेदवारांकडून अर्ज मागविण्यात येत आहेत. जाहिरातीत नमूद पदाकरीता अर्ज सादर करण्यापुर्वी उमेदवारांनी स्व:ता खात्री करावयाची आहे की, ते अर्ज करीत असलेल्या पदासाठीची विहित अर्हता /अटींची पुर्तता करीत असून सदर तात्पुरत्या कंत्राटी पदाकरीता ते पात्र आहेत.

| | |
|---|---|
| **पदनाम** | **कलाकार** |
| **पदे** | ०२ |
| **शैक्षणिक अर्हता** | १. उमेदवार मान्यताप्राप्त विद्यापीठाची उच्च माध्यमिक शालांत परिक्षा (बारावी) किंवा तत्सम परीक्षा उत्तीर्ण असावा.<br>२. उमेदवार बॅचलर ऑफ फाईन आर्ट ( कमर्शियल आर्ट ) ही पदवी परिक्षा उत्तीर्ण असावा.<br>३. उमेदवार संगणकाचा डिप्लोमा इन डिजीटल ग्राफिक्स विथ फोटोशॉप अँड कोरल ड्रॉ हा कोर्स पूर्ण केलेला असावा व संगणकावर आर्टवर्क तयार करणे या कामाचा ३ ते ५ वर्षे अनुभव असावा.<br>४. उमेदवार शासनमान्यता प्राप्त संस्थेचा १ वर्षे कालावधीचा Computer Operator & Programming Assistant अभ्यासक्रम उत्तीर्ण असावा.<br>५. उमेदवार शासनमान्य संस्थेचा Desk Top Publishing (DTP) ६ महिन्याचा अभ्यासक्रम उत्तीर्ण असावा.<br>६. उमेदवार महाराष्ट्र शासनमान्य टंकलेखनाची मराठी ३० श.प्र.मि व इंग्रजी ४० श.प्र.मि परीक्षा उत्तीर्ण असावा.<br>७. उमेदवार माध्यमिक शालांत प्रमाणपत्र परीक्षा किंवा तत्सम किंवा उच्चतम परीक्षेत १०० गुणांचा मराठी विषय (निम्नस्तर किंवा उच्चस्तर ) घेऊन उत्तीर्ण असावा.<br>८. उमेदवारांस ''डी.ओ.ई., ए.सी.सी. सोसायटीचे (सी.सी.सी.) किंवा (ओ स्तर) किंवा (ए स्तर) किंवा (बी स्तर) किंवा (सी स्तर) स्तरावरील प्रमाणपत्र किंवा महाराष्ट्र राज्य आणि तांत्रिकी शिक्षण मंडळाचे एम.एस.सी.आय.टी. किंवा जी.ई.सी. टी. चे प्रमाणपत्र धारक असावा किंवा सदर प्रमाणपत्र सादर करण्यास सूट देण्याकरीता उमेदवाराने शासनाने वेळोवेळी संगणक हाताळणी / वापराबाबत मान्यता दिलेला अभ्यासक्रम पूर्ण केलेला असावा. |
| **मानधन** | दरमहा निश्चित मानधन रुपये ४०,०००/- (अक्षरी रुपये चाळीस हजार मात्र) |
| **पदनाम** | **Accountant cum Data Entry Operator** |
| **पदे** | २४ |
| **शैक्षणिक अर्हता** | १. उमेदवार मान्यताप्राप्त शिक्षण मंडळाची माध्यमिक (S.S.C.) शालांत प्रमाणपत्र परीक्षा व उच्च माध्यमिक (H.S.C.) परिक्षा प्रमाणपत्र उत्तीर्ण असावा.<br>२. उमेदवार मान्यताप्राप्त विद्यापिठातून वाणिज्य शाखेची (B.COM) पदवी परिक्षा प्रमाणपत्र उत्तीर्ण असावा.<br>३. उमेदवार माध्यमिक शालांत प्रमाणपत्र वा तत्सम किंवा उच्च परीक्षा 100 गुणांची मराठी व 100 गुणांचा इंग्रजी विषय घेऊन उत्तीर्ण झालेला असावा. |

| | |
|---|---|
| | ३. उमेदवारांस ''डी.ओ.ई., ए.सी.सी. सोसायटीचे (सी.सी.सी.) किंवा (ओ स्तर) किंवा (ए स्तर) किंवा (बी स्तर) किंवा (सी स्तर) स्तरावरील प्रमाणपत्र किंवा महाराष्ट्र राज्य आणि तांत्रिक शिक्षण मंडळाचे एम.एस.सी.आय.टी. किंवा जी.ई.सी. टी. चे प्रमाणपत्र धारक असावा किंवा सदर प्रमाणपत्र सादर करण्यास सूट देण्याकरीता उमेदवाराने शासनाने वेळोवेळी संगणक हाताळणी / वापराबाबत मान्यता दिलेला अभ्यासक्रम पूर्ण केलेला असावा. |
| **मानधन** | दरमहा निश्चित मानधन रुपये १८,०००/- (अक्षरी रुपये अठरा हजार मात्र) |
| **अटी व शर्ती -** | 1) उमेदवार कंत्राटी कलाकार / **Accountant cum Data Entry Opretor** या पदाकरीता विहीत केलेल्या अर्हता धारण करणारे असावेत.<br>2) कंत्राटी कालावधीत काम करणा-या उमेदवारांची सेवा महापालिकेच्या नियमित तत्वावरील सेवेसाठी/ सेवाजेष्ठतेसाठी विचारात घेतली जाणार नाही किंवा महानगरपालिकेतील नोकरीसाठी प्राधान्य देण्यात येणार नाही, तसेच भविष्यात त्यांना कंत्राटी कलाकार / **Accountant cum Data Entry Operator** या पदावर कोणत्याही प्रकारचा हक्क सांगता येणार नाही.<br>3) निवड झालेल्या उमेदवारांस कंत्राटी पध्दतीवरील नियुक्ती करिता रु.500/- च्या बॉन्ड पेपरवर लेखी करारनामा सादर करावा लागेल.<br>4) उमेदवारांची ज्या कंत्राटी पदाकरिता निवड करण्यात आली असेल त्यांना त्या पदाकरिता उपरोक्त नमुद केल्याप्रमाणे प्रति महिना निश्चित मानधन देण्यात येईल. त्यांना अन्य कोणत्याही प्रकारचे भत्ते दिले जाणार नाहीत.<br>5) उमेदवाराला अनुज्ञेय असलेल्या सार्वजनिक सुट्टया व साप्ताहिक सुट्टी अनुज्ञेय असेल. तसेच, उपरोक्त कंत्राट कालावधीत त्यांना समप्रमाणात 7 ½ नैमित्तिक रजा अनुज्ञेय आहेत. याव्यतिरिक्त त्यांना कोणत्याही प्रकारच्या रजा अनुज्ञेय राहणार नाहीत.<br>6) कंत्राटी तत्वावरील नियुक्त्या या एकावेळी 179 दिवस किंवा नियमित तत्वावर सदर पदे भरेपर्यंत यापैकी जे अगोदर असेल एवढ्या कालावधीसाठी निव्वळ तात्पुरत्या स्वरुपात असतील. सदर पदावर नियमित तत्वावरील पदे भरे पर्यंत / उमेदवार उपलब्ध होई पर्यत किंवा इतर कोणत्याही कारणास्तव कंत्राटी तत्वावरील नियुक्त्या पूर्वसूचना न देता संपुष्टात आणण्याचे अधिकार कार्यकारी आरोग्य अधिकारी यांना असतील.<br>7) कराराच्या कालावधीत संबंधित कंत्राटी कलाकार / **Accountant cum Data Entry Operator** यांना कोणतेही प्रशासकीय अथवा आर्थिक संबंधात अधिकार प्रदान करण्यात येणार नाहीत.<br>8) सदरची नमेमणूक ही केवळ मानधन तत्वावर असल्याने व ती बृहन्मुंबई महानगरपालिका (सेवा) नियमावलीमधील अटी व शर्ती नुसार झाली नसल्यामुळे त्या अनुषंगाने मिळणारे निवृत्ती वेतन, भविष्य निर्वाह निधी अथवा तत्सम कोणत्याही प्रकारचे लाभ मिळण्यास ते पात्र राहणार नाहीत. अथवा ज्या पदावर नेमणूक केली आहे त्या पदावरील नियुक्तीच्या दिनांकापासून मिळणारे कोणत्याही प्रकारचे फायदे मिळणार नाहीत.<br>9) कंत्राटी तत्त्वावरील पदधारकाच्या नियुक्ती कालावधीमध्ये उमेदवाराने शिस्तभंग केल्याचे निदर्शनास आल्यास, अथवा संबंधित आस्थापना प्रमुखांच्या शिफारशीने असमाधानकारक कामाकरिता किंवा इतर कोणत्याही कारणासाठी सह कार्यकारी आरोग्य अधिकारी यांच्या स्वाक्षरीने सदर उमेदवारांची सेवा कोणतीही पूर्वसूचना दिल्याशिवाय समाप्त करण्यात येईल.<br>10) निवड झालेल्या उमेदवारांची मुंबई महानगरपालिकेच्या कार्यक्षेत्रातील कोणत्याही विभाग कार्यालय किंवा आरोग्य खात्यांतील इतर कार्यालयात नियुक्ती करण्यात येईल व आवश्यक तेथे त्यांना तिन्ही सत्रात (Shift) काम करावे लागेल.<br>11) कंत्राटी तत्वावर नियुक्त करण्यात आलेल्या कंत्राटी कलाकार / **Accountant cum Data Entry Operator** यांना बृहन्मुंबई महानगरपालिकेत नियुक्त करण्यात आलेल्या आस्थापना / विभागा व्यतिरिक्त मनपाच्या अन्य कार्यालयात इतरत्र कोठेही काम करता येणार नाही.<br>12) त्यांची नेमणुक करार पध्दतीची असल्याने त्यांना कोणत्याही न्यायालयात जाता येणार नाही. तसेच, त्यांना महानगरपालिकेत नियमित सेवेसाठी कोणत्याही प्रकारचार हक्क सांगता येणार नाही.<br>13) सदर उमेदवारांसाठी निवासस्थानांची व्यवस्था केली जाणार नाही.<br>14) उमेदवाराची नेमणूक कंत्राटी तत्वावर निव्वळ तात्पुरत्या स्वरूपात 179 दिवस असेल. आवश्यकता |

| | |
|---|---|
| | भासल्यास त्यानंतर सदर कंत्राट तत्वावरील नियुक्ती 1 दिवसाचा सेवाखंड देऊन पुन्हा करार करुन पुढील 179 दिवसा करिता कंत्राटी तत्वावर नियुक्ती  करण्यात येईल.<br>15) उमेदवाराचा भ्रमणध्वनी  क्रमांक, ई-मेल आयडी आणि पत्रव्यवहाराचा पत्ता (पिनकोड सह) सुस्पष्ट व पूर्ण असावा.<br>16) महिला उमेदवारांनी विवाह नोंदणी प्रमाणपत्र, नावात बदल झाल्याचे राजपत्र सादर करावे. विवाह नोंदणी प्रमाणपत्र, राजपत्र नसल्यास विवाहित  महिला उमेदवार विवाहापूर्वीच्या  नावाने अर्ज करु शकतात.<br>17) निवड झालेल्या उमेदवारास त्याच्या पदाचा राजीनामा द्यावयाचा असल्यास त्याने 15 दिवसांची  लेखी पूर्वसूचना देणे बंधनकारक आहे.<br>18) विना परवानगी  गैरहजर राहिल्यास  त्यांचे त्या दिवसाचे  वेतन कपात करण्यात येईल.<br>19) निवडप्रकिया सुरु झाल्यानंतर किंवा नियुक्तीनंतर कोणत्याही क्षणी उमेदवाराने चुकीची माहिती / प्रमाणपत्रे / कागदपत्रे सादर केल्याचे किंवा कोणतीही माहिती दडवून ठेवल्याचे निदर्शनास आल्यास त्याची उमेदवारी रद्दबातल करण्यांत येईल. तसेच नियुक्ती झालेली असल्यास कोणतीही पूर्वसूचना न देता त्याची नियुक्ती समाप्त करण्यांत येईल.<br>20) निवड यादी सार्वजनिक आरोग्य खात्याच्या सूचना फलकावर प्रसारित करण्यात येईल.<br>21) सार्वजनिक आरोग्य खात्यात यापूर्वी सदर पदावर काम केलेल्या उमेदवारांच्या बाबत काही तक्रार यापूर्वी अथवा सद्य स्थितीत प्राप्त झाल्यास सदर तक्रारीची  शाहनिशा करुन सदर उमेदवारास पात्र अथवा अपात्र ठरविण्याचे अधिकार सह कार्यकारी आरोग्य अधिकारी  यांना असतील.<br>22) उमेदवाराचे दि.०१.०९.२०२५ रोजीचे वय १८ वर्षापेक्षा कमी व ४३ वर्षा पेक्षाजास्त नसावे.<br>23) निवड झालेल्या उमेदवारांना नियुक्तीनंतर मुंबई महापालिका (सेवा) नियम 1989 तसेच, बृहन्मुंबई महानगरपालिका सेवा (वर्तणूक) नियम 1999 लागू होणार नाहीत.<br>24) कंत्राटी पदभरती प्रक्रियेत आवश्यकतेनुसर बदल करण्याचे व / वा सदर पदभरती अंशत: किंवा पूर्ण रद्द करण्याचा अधिकार मा. आयुक्त / कार्यकारी आरोग्य अधिकारी यांना आहेत. |
| **विशेष सुचना** | 1. सदर कंत्राटी पध्दतीचा कालावधी फक्त १७९ दिवसांचा राहिल .<br>2. कंत्राटी पध्दतीवर नेमणूक केलेल्या उमेदवारांची सेवा त्यांना पूर्वसुचना न देता संपुष्टात आणण्याचे आधिकार प्रशासनास राहतील.<br>3. कंत्राटी कालावधीत काम करणाऱ्या उमेदवारांची सेवा तात्पूरत्या स्वरुपाची असल्याने त्यांची सदर सेवा सेवाजेष्ठतेसाठी विचारत घेतली जाणार नाही किंवा सदर सेवेला सेवाजेष्ठतेसाठी प्राधान्य देण्यात येणार नाही. तसेच, त्यांना नियमित पदावर हक्क सांगता येणार नाही.<br>4. निवड झालेल्या उमेदवारांनी संबंधित पदावर नियुक्ती करण्यापूर्वी सोबत जोडलेल्या करारनाम्याच्या नमुन्या प्रमाणे 500/- रुपयाच्या बॉन्ड पेपरवर करारनामा द्यावा लागेल.<br>5. यापूर्वी संबंधित कार्यालयात व अन्य ठिकाणी सादर केलेले व पोष्टाने प्राप्त झालेले अर्ज विचारात घेतले जाणर नाहीत तसेच, बृहन्मुंबई महानगरपालिकेने कोणत्याही व्यक्तीला व इतर दुसऱ्या संस्थेला अर्ज विकणे, स्विकारणे इत्यांदीचा अधिकार दिलेला नाही, याची कृपया सर्वांनी नोंद घ्यावी.<br>6. जर एखादया उमेदवाराने भरतीच्या कोणत्याही टप्यावर दबाव आणण्याचा प्रयत्न केल्यास किंवा अनुचित माध्यमांचा अवलंब केल्याचे किंवा तोतया व्यक्तींची व्यवस्था केल्याचे आढळल्यास त्याला निवडीतून अपात्र ठरविण्यात येईल.<br>7. मध्यस्थ/ठक/मुंबई महानगरपालिकेत संबंध असल्याचे भासविणाऱ्या व्यक्ती यांचा गैरमार्गाने नोकरी मिळवून देण्याच्या आश्वासनापासून सावध राहण्याच्या उमेदवारांना सूचना देण्यात येत आहेत.<br>8. प्रशासकीय किंवा अन्य कारणास्तव भरती प्रक्रिया कोणत्याही वेळेस किंवा कोणत्याही टप्यावर थांबविण्याचे अधिकार बृहन्मुंबई महानगरपालिका आयुक्त/ कार्यकारी आरोग्य अधिकारी यांना आहेत.<br>9. उमेदवाराने जाहिरातीनुसार गुगल फॉमद्वारे अर्ज करावा.<br>10. गुणवत्तेनुसार स्थानिक उमेदवारांचा प्राधान्याने विचार करण्यात येईल परंतु अंतिम निर्णय प्रशासनाचा राहिल.<br>11. उमेदवाराने एकदा अर्ज केल्यानंतर विहित वेळ समाप्त झाल्यानंतर कोणतेही कागदपत्रे नंतर आणून दिल्यास ती  कागदपत्रे ग्राहय धरली  जाणार नाहीत व त्यांचा अर्ज अपूर्ण समजून अपात्र ठरविण्यात येईल. |

| | |
|---|---|
| **निवडीचे निकष** | 1. कंत्राटी कलाकार या पदाकरिता विहित केलेल्या शैक्षणिक अर्हतेनुसार बॅचलर ऑफ फाईन आर्ट ( कमर्शियल आर्ट ) पदवी परिक्षेतील अंतिम प्राप्त गुण निवडीसाठी विचारात घेतले जातील.<br>2. कंत्राटी Accountant cum Data Entry Opretor या पदाकरिता विहित केलेल्या शैक्षणिक अर्हतेनुसार वाणिज्य शाखेच्या ( B.COM ) पदवी परिक्षेतील अंतिम प्राप्त गुण निवडीसाठी विचारात घेतले जातील.<br>3. उपरोक्त प्रमाणे दोन्ही पदांच्या गुणवत्ता यादी तयार करताना सार्वजनिक आरोग्य खात्यामध्ये **कंत्राटी कलाकार / कंत्राटी Accountant cum Data Entry Opretor** या पदावर कमीत कमी १ वर्षे काम केल्याचा अनुभव असल्यास सदर उमेदवारांच्या अंतिम गुणांमध्ये १० गुण मिळविले जातील व त्यानुसार गुणवत्ता यादी तयार करण्यात येईल व सदर गुणवत्ता यादीनुसार कागदपत्रांच्या पडताळणी नंतर निवड यादी तयार करण्यात येईल.<br>4. कंत्राटी कलाकार या पदासाठी मान्यताप्राप्त संस्थेमध्ये संगणकावर आर्टवर्क तयार करणे या कामाचा ३ ते ५ वर्षे काम केल्याचे अनुभवाचे प्रमाणपत्र जोडणे आवश्यक आहे.<br>5. उमेदवाराच्या पदस्थापनेबाबतचे व निवडीच्या निकषामध्ये बदल करण्याचे सर्व अधिकार मा.कार्यकारी आरोग्य अधिकारी यांना राहतील. |

सही/-

**डॉ.दक्षा शाह**

**कार्यकारी आरोग्य अधिकारी**

**बृहन्मुंबई महानगरपालिका**
**सार्वजनिक आरोग्य खाते**
सह कार्यकारी आरोग्य अधिकारी यांचे कार्यालय, रुम न. १३,
पहिला माळा, एफ/दक्षिण विभाग कार्यालय,
डॉ. बाबासाहेब आंबेडकर मार्ग, परळ, मुंबई १२

**क्र. एचओ/९०८९/कुकवमाबासं/आस्था-१ दि. १०.०९.२०२५**

## जाहीरात

बृहन्मुंबई महानगरपालिकेतील सार्वजनिक आरोग्य खात्यांतर्गत कुटुंब कल्याण व माता बाल संगोपन विभागाकरिता खालील तक्त्यात नमूद संवर्गाची रिक्त पदे कंत्राटी तत्वावर भरण्यासाठी मा. महानगरपालिका आयुक्त यांची क्र. एमजीसी/एफ/6962 दि. 25.06.2025 अन्वये दि.16.08.2025 ते दि.31.03.2027 या कालावधीकरिता प्रत्येकी 179 दिवसानंतर 01 दिवसाचा सेवा खंड देऊन कंत्राटी तत्वावर किंवा नियमित तत्वावर सदर पदे भरेपर्यंत यापैकी जे अगोदर असेल एवढया कालावधीसाठी कंत्राटी पध्दतीने रिक्त पदे भरण्याकरिता मंजूरी प्राप्त झाली आहे. सदर मंजुरीच्या अनुषंगाने खालील अर्हता धारण करणा-या व अटींची पुर्तता करण्या-या इच्छूक उमेदवारांकडून विहित नमुन्यामध्ये अर्ज मागविण्यात येत आहेत. सदर पदे कंत्राटी तत्वावर आवश्यकतेप्रमाणे भरली जातील.

| **अ.क्र.** | **पदनाम** | **रिक्त पदांची संख्या** |
|---|---|---|
| 1 | कलाकार | ०२ |
| 2 | Accountant cum Data Entry Operator | २४ |

बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या http://portal.mcgm.gov.in या संकेत स्थळावर सदरची संपुर्ण **जाहिरात अटी व शर्ती सह** तसेच **वैयक्तिक माहितीप्रपत्र** प्रसिध्द करण्यात येत आहे. संकेतस्थळावरील जाहिरातीला अनुसुरून विहित अर्हता व अटींची पुर्तता करणा-या उमेदवारांनी ऑनलाईन पध्दतीने गुगल फॉर्म या https://shorturl.at/6u3tH गुगल लिंकव्दारे दि. 15.09.2025 ते दि.22.09.2025 पर्यंत अर्ज भरावयाचे आहेत तसेच अर्ज व प्रमाणपत्राच्या मूळ प्रती साक्षांकित व छायांकित प्रतीसह कागदपत्रांच्या पडताळणीच्यावेळी घेऊन यावे. दूरध्वनीव्दारे कोणतीही माहिती कळविली जाणार नाही. उमेदवारांनी अर्ज सादर करण्यापुर्वी महानगरपालिकेच्या संकेत स्थळावरील सूचना काळजीपुर्वक वाचाव्यात तसेच **सोबत जोडण्यात आलेल्या अटी व शर्ती काळजीपूर्वक वाचाव्यात तसेच सोबत जोडण्यात आलेले विहीत नमून्यातील वैयक्तिक माहितीप्रपत्र** उमेदवारांनी पडताळणीच्यावेळी सादर करावे. **उमेदवारांची निवड यादी सूचनाफलकावर प्रसारित केली जाईल.**

**सही/-**
**डॉ.दक्षा शाह**
**कार्यकारी आरोग्य अधिकारी**

# <u>वैयक्तिक माहितीपत्र (BIO-DATA)</u>

उमेदवाराने त्याचे अलिकडे काढलेले
पारपत्र आकाराचे छायाचित्र लावून
फोटोवर स्वाक्षरी करावी

2.5 से.मी. X 3 से.मी

**प्रति,**

कार्यकारी आरोग्य अधिकारी यांचे कार्यालय,
3रा मजला, एफ/दक्षिण विभाग
डॉ.बाबासाहेब आंबेडकर मार्ग, परेल, मुंबई-400012 .

**पदाचे नाव** - कलाकार / **Accountant cum Data Entry Operator**

बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या सार्वजनिक आरोग्य खात्यातंर्गत कुटुब कल्याण व मात बाल संगोपन विभागाच्या वर नमूद केलेल्या कंत्राटी पदाकरीता दि...............च्या जाहिरातीनुसार मी खाली सही करणार विनंती अर्ज सादर करीत आहे.

1) संपूर्ण नाव (आडनांव प्रथम) मराठीत:------------------------------------------------------------

2) वडिलांचे /पतीचे संपूर्ण नाव: =------------------------------------------------------

3) विवाहापूर्वीचे संपूर्ण नाव (महिलांकरिता) :-------------------------------------------------------

4) पत्ता :-----------------------------------------------------------------------------
-----------------------------------------------------------------------------------

5) दूरध्वनी क्रमांक:-----------------------------------------------------------------

6) इ-मेल आय डी :-------------------------------------------------------------------

7) लिंग- पुरुष------------------स्त्री---------------------------

8) जन्मदिनांक: दिनांक-----------------महिना----------------------- वर्ष---------------------------

दिनांक--------------------- रोजी असलेले वय--------------महिने-------------- दिवस-------------

9) शैक्षणिक अर्हता:

| शैक्षणिक अर्हता | विद्यापीठाचे नाव | गुणांचा तपशील | | | शालांत परीक्षेतील गुण | | उत्तीर्णतेचे प्रयत्न |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | प्राप्त गुण | पैकी | टक्केवारी | मराठी | इंग्रजी | |
| एस.एस.सी | | | | | | | |
| एच.एस.सी | | | | | | | |
| पदवी | | | | | | | |
| | | | | | | | |

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | | |
| | | | | | | | |

10) अनुभव:--------------------------------------------------------------------------------------

11) स्थानिक पोलीस ठाण्याचा पूर्ण पत्ता:------------------------------------------------------------------
--------------------------------------------------------------------------------------------------

12) उंची :---------- फूट--------- इंच, वजन :----------कि.ग्रा., शरीराची ठेवण: किरकोळ /मध्यम/सुद्रुढ
वर्ण: -------------------नेत्र वर्ण :--------------------वैयक्तिक खूण:----------------------

13) संगणकविषयक ज्ञान: MS-CIT किंवा शासनाने विहित केलेल्या संगणक विषयक अभ्यासक्रमाचे प्रमाणपत्र : आहे / नाही

14) उमेदवार सध्या नोकरी करीत आहे किंवा नाही ? - होय / नाही
असल्यास त्याबाबतचा तपशील :----------------------------------------------------------------
----------------------------------------------------------------------------------------------

15) उमेदवाराविरुद्ध पोलीस चौकशी / न्यायालयिन प्रकरण प्रलंबित /प्रस्तावित आहे का ? - होय / नाही
असल्यास त्याबाबतचा तपशील:-
----------------------------------------------------------------------------------------
----------------------------------------------------------------------------------------------

16) उमेदवारास पूर्वी शिक्षा झाली होती का ? - होय / नाही
शिक्षा झाली असल्यास, शिक्षेचा तपशील :-----------------------------------------------------------
---------------------------------------------------------------------------------------------

आपला / आपली विश्वासू,

दिनांक:

अर्जदाराची सही
(अर्जदाराचे नाव)

**सोबतची प्रमाणपत्रे -**

१)
२)
३)